RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग दोन

वर्ष ७, अंक ९] शुक्रवार, फेब्रुवारी १२, २०२१ / माघ २३, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये १२.००

## असाधारण क्रमांक १५

## प्राधिकृत प्रकाशन

## खालापूर नगरपंचायत, खालापूर

### जाहीर सूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) च्या अनुषंगाने कलम २३(१) नुसार खालापूर नगरपंचायत क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.**

क्र. नपंखा/विकास योजना/१६१५/२०२०-२१

शासनाने, नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ/२०१४/प्र.क्र. २०६/नवि-१९, दिनांक २६ जून २०१५ अन्वये खालापूर नगरपंचायत स्थापन केलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (२) अन्वये नगरपंचायत क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास होण्यासाठी त्या क्षेत्राची विकास योजना तयार करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) च्या अनुषंगाने कलम २३(१) अन्वये खालापूर नगरपंचायतीने विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी प्रशासकीय ठराव क्र. ०१, दिनांक ११ फेब्रुवारी २०२१ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (२) नुसार खालापूर नगरपंचायतीचा विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा नगरपंचायतीच्या कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरिकांच्या याबाबत काही सूचना/हरकती असतील त्यांनी ही सूचना **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून ६० (साठ) दिवसांच्या आत मुख्याधिकारी, खालापूर नगरपंचायत यांचेकडे लेखी स्वरूपात द्याव्यात. विकास योजना तयार करताना त्या सूचना/हरकतींचा योग्य तो विचार करण्यात येईल.

**सुरेखा रामदास भणगे,**
मुख्याधिकारी,
खालापूर नगरपंचायत.

ठिकाण : खालापूर,
दिनांक १२ फेब्रुवारी २०२१.

## KHALAPUR NAGARPANCHAYAT, KHALAPUR

### Notice

**Declaration of Intention to prepare Development Plan of Khalapur Nagarpanchayat as per section 23 (*1*) read with section 21(*2*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

क्र. नपंखा/विकास योजना/१६१५/२०२०-२१

Government of Maharashtra in Urban Development Department, *vide* its Notification No. MCO/2014/Ref. No. 206/N.V-19, dated 26th June 2015 constituted Khalapur Nagarpanchayat. It is necessary to prepare the Development Plan for the area of Khalapur Nagarpanchayat as per section 21(*2*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for planned development of the said area.

Hence, the Khalapur Nagarpanchayat by its resolution No. 01, dated 11th February 2021 has given consent to declare its intention to prepare Development Plan, as per provision of section 23 (*1*) read with section 21(*2*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly, this notice is being published.

The plan showing boundary of the area included in Development Plan of Khalapur Nagarpanchayat is kept open for inspection by the public on office working days, during office hours at the Office of the Khalapur Nagarpanchayat, as required under section 23(*2*) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.

Any suggestion/objection of the public in this regard, may be forwarded in writing to the Chief Officer, Khalapur Nagarpanchayat within a period of 60 (sixty) days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette*. The suggestion/objection shall be duly considered while preparing the Development Plan.

SUREKHA RAMDAS BHANAGE,
Chief Officer,
Khalapur Nagarpanchayat.

Place : Khalapur,
Dated 12th February 2021.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.